नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १०१ Issue - 101 | वार गुरुवार दि. २८ ऑगस्ट २०२५ Blow- Thursday Date 28 August 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# आंदोलनासाठी परवानगी अन् अटी शर्तीही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठा आंदोलनाकांसाठी एक मोठी बातमी असून मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानावरील आंदोलनाला पोलिसांनी परवानगी दिली आहे. ही परवानगी सध्या केवळ एका दिवसासाठी असून त्यामध्ये काही अटीशर्तीही घालण्यात आल्या आहेत. त्यानुसार आंदोलनाच्या काळात गणेशोत्सव सुरू असल्याने वाहतुकीला अडथळा, नागरिकांना त्रास होईल असं वर्तन करता येणार नाही. तसेच या आंदोलनाला सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत परवानगी असेल असं मुंबई पोलिसांनी त्यांच्या आदेशात म्हटलं आहे.

## मनोज जरांगे कार्यकर्त्यांसह मुंबईकडे रवाना; लाखोंचा जनसमुदाय

मनोज जरांगे यांनी या आधी आझाद मैदानावरील आंदोलनास परवानगी नाकारण्यात आली होती. त्यानंतर आता त्यांना काही अटीशर्तींसह परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार मनोज जरांगे यांना फक्त एका दिवसासाठी आंदोलन करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तसेच त्यांच्यासोबत फक्त पाच हजार आंदोलकांना उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली आहे.

एका दिवसात मागण्या मान्य करा, जरांगेंची मागणी

एका दिवसात जर सरकार आमच्या मागण्या मान्य करत असेल तर त्यांच्या अटी आम्हाला मान्य आहेत. आम्हाला जर एका दिवसाच्या आंदोलनाची परवानगी दिली तर सरकारने एका दिवसात आरक्षण द्यावं. पण जर मागण्या मान्य केल्या नाहीत तर आम्ही उठणार नाही.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनासाठी मुंबई पोलिसांच्या मुख्य अटी



आंदोलनाला एका वेळी फक्त एकाच दिवसाची परवानगी असेल. शनिवार, रविवार किंवा शासकीय सुट्टीच्या दिवशी परवानगी मिळणार नाही.

ठराविक वाहनांनाच परवानगी असेल. वाहनांची पार्किंग व्यवस्था पोलीसांच्या सल्लयाने करावी लागेल. आंदोलकांची वाहने ईस्टर्न फ्रीवेवरून वाडीबंदरपर्यंत येतील. त्यानंतर मुख्य नेत्यासोबत फक्त ५ गाड्यांना आझाद मैदानात प्रवेश मिळेल. बाकीच्या गाड्या पोलिसांनी सांगितलेल्या ठिकाणी पार्क कराव्या लागतील.

आंदोलनात जास्तीत जास्त पाच हजार लोकच सहभागी होऊ शकतात. आझाद मैदानासाठी सात हजार चौ. मीटर जागा राखीव असून ती इतक्या लोकांनाच सामावून घेऊ शकते. त्याच दिवशी इतर आंदोलकांनाही परवानगी दिली असल्याने त्यांचा हक्क अबाधित राहील.

आंदोलनाच्या वेळी मोर्चा काढता येणार नाही.

परवानगीशिवाय माईक, स्पीकर किंवा गोंगाट करणारी साधने वापरता येणार नाहीत.

आंदोलनाची वेळ सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच मर्यादित आहे. त्यानंतर मैदानात थांबता येणार नाही.

आंदोलनाच्या जागेत स्वयंपाक करणे, कचरा टाकणे पूर्णपणे बंदी आहे.

आंदोलनाच्या काळात गणेशोत्सव सुरू असल्याने वाहतुकीला अडथळा, नागरिकांना त्रास किंवा धार्मिक भावना दुखावणारे वर्तन करता येणार नाही.

आंदोलनात लहान मुले, गरोदर स्त्रिया आणि वृद्धांना सहभागी करू नये.

गणेशोत्सवाच्या दरम्यान हे आंदोलन करण्यात येत आहे. त्यामुळे मुंबईतील रहदारीस कोणताही आंदोलनाच्या काळात गणेशोत्सव सुरू असल्याने वाहतुकीला अडथळा, नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात यावी असं पोलिसांनी म्हटलं आहे.

# मनोज जरांगे मुंबईकडे निघताच हालचालींना वेग, संघर्षयोद्ध्याशी सरकार पुन्हा चर्चा करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चांगलाच पेटला असून मनोज जरांगे पाटील (चरपेक्ष गर-ारपसश झरींळश्र) यांनी आज अंतरवली सराटी येथून मुंबईकडे कूच केली आहे. सणासुदीच्या काळात आंदोलन टाळावे, सरकारसोबत चर्चा करावी, अशी विनंती सरकारकडून करण्यात आली. मात्र, जरांगे पाटील आपल्या मागण्यांवर ठाम असून, आंदोलनाची दिशा आता थेट मुंबईकडे वळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या या निर्णयाला सत्तेतील आणि विरोधी पक्षातील काही आमदार, खासदारांनी पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे सरकारची देखील कोंडी झाल्याची चर्चा आहे.

अशातच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दरे (ऊीश तळश्रश्ररसश) गावचा दौरा अचानक रद्द झाल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदे हे गणेशत्सवासाठी दरवर्षी दरे या आपल्या मूळगावी जात असतात. मात्र हा दौरा रद्द होण्यामागील नेमकं कारण काय हे अद्याप कळू शकलेलं नाही. परिणामी नियोजित असलेला दौरा अचानक रद्द झाल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दरे गावचा दौरा अचानक रद्द झाल्याने या बाबत मनोज जरांगे यांचे सुरु असलेलं आंदोलन देखील कारणीभूत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगेंशी सरकार पुन्हा चर्चा करणार का? हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे. तर मराठा आरक्षणासाठी जरांगेंनी देवेंद्र फडणवीसांना टार्गेट केलं असताना शिंदेंनी आजपर्यंत त्यावर मौन बाळगल्याचं दिसून येतंय. मुख्यमंत्री असताना जरांगेंची आंदोलनं हाताळण्याचा अनुभव असताना शिंदे आता गप्प का आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दुसरीकडे, मराठा आरक्षणासाठी मुंबईत येऊन आंदोलन करण्याच्या



तयारीत असलेले मनोज जरांगे-पाटील यांची मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील आणि उद्योग मंत्री उदय सामंत आज मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेणार असल्याची माहीती समोर आली आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या सोबत राधाकृष्ण विखे पाटील आणि उदय सामंत यांची भेट अहिल्यानगर किंवा पुणे येथे होणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. उद्योग मंत्री उदय सामंत थोड्याच वेळात अहिल्यानगर येथे पोहचणार असल्याचेही सांगितलं जातंय.

# राज्यातील ३८ नवीन सब स्टेशन उभारणी, वीज वाहिन्यांच्या प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करावीत : ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करत असताना या विकासासाठी उद्योग, कृषी आणि विविध क्षेत्रांना मोठ्या प्रमाणात वीज ऊर्जेची गरज भासणार आहे यासाठी महावितरणमार्फत उभारण्यात येणाऱ्या ३८ नवीन सब स्टेशन आणि वीज वाहिन्यांच्या प्रकल्पांची कामे वेळेत पूर्ण करण्याकडे लक्ष दिले जावे, असे प्रतिपादन ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केले. एमएसईबी होल्डिंग कंपनी कार्यालय फोर्ट येथे आढावा बैठक ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच झाली. बैठकीत महावितरण आणि महापारेषण अंतर्गत सुरू असलेल्या विविध सब स्टेशनची उभारणी आणि उच्च दाब वाहिनी प्रकल्प कामांचा आढावा घेतला. यावेळी संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, मुख्य अभियंता महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (प्रकल्प) सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता माणिक गुट्टे उपस्थित होते. ऊर्जा राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या, राज्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) अंतर्गत ३८ सब स्टेशनच्या उभारणीसाठी कार्यवाही केली जात आहे. या प्रकल्पांच्या उभारणीमुळे पुणे शहर, नागपूर येथील मिहान औद्योगिक वसाहत तसेच राज्यातील विविध ठिकाणच्या वीज पुरवठा व उपलब्धतेमध्ये मोठी सुधारणा होईल.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्याकडून मान्यता प्राप्त होऊन देखील विविध प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत. सर्व प्रकल्प होण्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया वेगाने केल्या जाव्यात, असे राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी यावेळी सांगितले. यावेळी अमरावती करजगाव येथील १३२ केवी सबस्टेशन, पुणे शिक्रापूर येथील ७६५ किलो वॅट सबस्टेशन, पाचगाव येथील २२० केवी सबस्टेशन येथील कामे पूर्ण झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी विविध प्रकल्पातील कामांच्या गतीचा त्यांनी आढावा घेतला. यामध्ये छत्रपती संभाजी नगर, अमरावती, परभणी, हिंगोली, सातारा, पुणे यासह विविध जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांची त्यांनी तपशीलवार माहिती घेतली.

# महाराष्ट्रातील चार शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर केले असून, महाराष्ट्रातील चार शिक्षकांनी आपल्या उत्कृष्ट योगदानामुळे हा प्रतिष्ठित सन्मान प्राप्त केला आहे. शालेय आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील या शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, संशोधन आणि सामाजिक योगदानाद्वारे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा दिली आहे. हा पुरस्कार ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय स्तरावरील समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने देशभरातील २७ राज्ये, ७ केंद्रशासित प्रदेश आणि ६ संस्थांमधून ४५ शिक्षकांची निवड राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ साठी केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नांदेड येथील जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धपूर येथील डॉ. शेख मोहम्मद वकुओद्दीन शेख हमीदोद्दीन आणि लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ आर्टमधील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे यांचा समावेश आहे. या दोन्ही शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या समर्पित कार्यामुळे हा पुरस्कार मिळवला आहे. निवड प्रक्रिया पारदर्शी आणि कठोर स्वरूपाची असून, ती जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन स्तरांवर २३ जून ते २० जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने पार पडली. एकूण ४५ पुरस्कार विजेत्यांपैकी २४ पुरुष आणि २१ महिला शिक्षकांचा समावेश आहे.

उच्च शिक्षण विभागाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ साठी देशभरातील २१ शिक्षकांची निवड केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबईतील शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. नीलाक्षी जैन आणि बारामती येथील एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग महाविद्यालयातील प्रा. पुरुषोत्तम पवार यांचा समावेश आहे.

**अमेरिकेला होणाऱ्या ६६ टक्के निर्यातीवर परिणाम होणार**


**मोठा फटका बसण्याची शक्यता**

# भारतावर ५० टक्के ट्रम्प टॅरिफ लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर ५० टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी आजपासून सुरु झाली आहे. भारतानं रशियाकडून तेली खरेदी सुरु ठेवल्यानं ट्रम्प यांनी टॅरिफ वाढवण्याचा निर्णय घेतला. २७ ऑगस्ट म्हणजेच आजपासून ५० टक्के टॅरिफ लागू झालं आहे. या निर्णयामुळं भारताकडून अमेरिकेला होणाऱ्या ८६ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीपैकी ६० अब्ज डॉलर्सची निर्यात प्रभावित होईल. याचा सर्वाधिक परिणाम मस्त्य उत्पादनं, कपडे, चामडे, रत्न आणि दागिने यासारख्या कामगारकेंद्री क्षेत्रांवर परिणाम होईल.

अमेरिकेच्या ५० टक्के टॅरिफचा थेट परिणाम कापड क्षेत्रावर होईल. या क्षेत्रातून अमेरिकेला १०.३ अब्ज डॉलर्सची निर्यात होते. रत्न आणि दागिने उद्योगाला देखील याचा मोठा फटका बसणार आहे. या उद्योगासाठी अमेरिका मोठी बाजारपेठ आहे.



झींगा आणि सागरी उत्पादनांपासून तयार होणाऱ्या खाद्य पदार्थांच्या निर्यातीवर गंभीर परिणाम होणार आहेत चामडे आणि शूज, चपला निर्मितीवर उद्योगावर देखील उत्पादन थांबवण्याची आणि कर्मचाऱ्यांची संख्या कमी करण्याची वेळ येऊ शकते. फर्निचर सारख्या उद्योगावर देखील परिणाम होऊ शकतो.

ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिवच्या रिपोर्टनुसार अमेरिकेनं भारतावर लादलेल्या ५० टक्के टॅरिफमुळं सध्याच्या निर्यातीपैकी एकूण ६६ टक्के निर्यातीवर परिणाम होईल. २७ ऑगस्टपासून ६०.२ अब्ज डॉलर्सच्या किमतीच्या निर्यातीवर ५० टक्के टॅरिफ अमेरिका आकारेल. यामध्ये कापड, रत्न आणि झींगा याचा समावेश आहे.

भारतावरील ट्रम्प टॅरिफचा 'या' देशांना फायदा

जीटीआरआयचे सह संस्थापक अजय श्रीवास्तव यांनी म्हटलं की भारताला गेल्या अनेक वर्षांमधील सर्वात मोठा व्यापारी धक्का आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये भारताची अमेरिकेला होणारी निर्यात ४९.६ अब्ज डॉलर्सपर्यंत कमोही होऊ शकते. भारतावरील टॅरिफमुळं चीन, व्हिएतनाम, मेक्सिको, तुर्की, पाकिस्तान, नेपाळ आणि केनिया या देशांना फायदा होईल.

दरम्यान, रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्ध सुरु असताना भारतानं रशियाकडून तेल खरेदी केल्यानं भारतावर अमेरिकेनं ५० टक्के टॅरिफ लादलं आहे. पहिल्यांदा डोनाल्ड ट्रम्प यांनी २५ टक्के टॅरिफ लादलं होतं. त्यानंतर पुन्हा २५ टक्के टॅरिफची घोषणा करत त्याची अंमलबजावणी २७ ऑगस्टपासून होईल असं सांगितलं होतं. गेल्या अनेक वर्षांमध्ये अमेरिकेकडून भारतावर पहिल्यांदा मोठ्या प्रमाणात टॅरिफ लादलं गेलं आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध थांबवल्याचा पुन्हा दावा केला आहे. भारतावर डोकं गरगरेल इतकं टॅरिफ लावण्याची धमकी युद्ध थांबवण्यासाठी दिली होती, असं ट्रम्प म्हणाले.

# राज्य सरकारकडून शिक्षकांच्या टप्पा अनुदानाला मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : राज्यातील विविध शाळांमधील शिक्षकांनी टप्पा अनुदानासाठी आंदोलन केले होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या टप्पा अनुदानासाठी निधी देण्याच्या निर्णयाला मंजुरी देण्यात आली होती. अखेर यासाठी आता शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला असून, यामुळे राज्यातील ५२ हजार २७६ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना थेट फायदा होणार आहे. हा निर्णय १ ऑगस्ट २०२५ पासून लागू करण्यात आला आहे.

शालेय शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या या शासन निर्णयानुसार, सध्या २० टक्के, ४० टक्के व ६० टक्के टप्पा अनुदान घेणाऱ्या शाळांना पुढील २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. तसेच, पात्र ठरलेल्या २३१ शाळांना नव्याने २० टक्के अनुदान मिळणार आहे. या निर्णयामुळे दरवर्षी सरकारवर अंदाजे ९७० कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

राज्यातील खासगी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा, तुकड्या व त्यावरील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना येत्या ऑगस्ट महिन्यापासून वेतन अनुदानाचा पुढील टप्पा देण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीला नुकतीच मंत्रिमंडळात मंजुरी देण्यात आली होती. यासंदर्भात राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेच्या अधिवेशनात निवेदन दिले होते. त्यानंतर आता प्रत्यक्ष अनुदान टप्पा मंजूर करण्यासाठी शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील ५० हजारांपेक्षा अधिक शालेय कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

शालेय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. राज्य सरकारने टप्पा अनुदानाला मंजुरी दिली आहे. यामुळे ५२ हजारांपेक्षा जास्त शिक्षक व कर्मचाऱ्यांना फायदा होणार आहे. हा निर्णय १ ऑगस्ट २०२५ पासून लागू होईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला हिरवा कंदील दाखवण्यात आला. अनेक दिवसांपासून शिक्षक संघटना याची मागणी करत होत्या. आता त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### चर्चेने तोडगा

राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चांगलाच पेटला असून मनोज जरांगे पाटील यांनी आज अंतरवली सराटी येथून मुंबईकडे कूच केली आहे. सणासुदीच्या काळात आंदोलन टाळावे, सरकारसोबत चर्चा करावी, अशी विनंती सरकारकडून करण्यात आली. मात्र, जरांगे पाटील आपल्या मागण्यांवर ठाम असून, आंदोलनाची दिशा आता थेट मुंबईकडे वळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या या निर्णयाला सत्तेतील आणि विरोधी पक्षातील काही आमदार, खासदारांनी पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे सरकारची देखील कोंडी झाल्याची चर्चा आहे. अशातच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दरे गावचा दौरा अचानक रद्द झाल्याची माहिती समोर आली आहे. एकनाथ शिंदे हे गणेशत्सवासाठी दरवर्षी दरे या आपल्या मूळगावी जात असतात. मात्र हा दौरा रद्द होण्यामागील नेमकं कारण काय हे अद्याप कळू शकलेलं नाही. परिणामी नियोजित असलेला दौरा अचानक रद्द झाल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दरे गावचा दौरा अचानक रद्द झाल्याने या बाबत मनोज जरांगे यांचे सुरु असलेलं आंदोलन देखील कारणीभूत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे मराठा आंदोलक मनोज जरांगेंशी सरकार पुन्हा चर्चा करणार का? हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे. तर मराठा आरक्षणासाठी जरांगेंनी देवेंद्र फडणवीसांना टार्गेट केलं असताना शिंदेंनी आजपर्यंत त्यावर मौन बाळगल्याचं दिसून येतंय. मुख्यमंत्री असताना जरांगेंची आंदोलनं हाताळण्याचा अनुभव असताना शिंदे आता गप्प का आहेत, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दुसरीकडे, मराठा आरक्षणासाठी मुंबईत येऊन आंदोलन करण्याच्या तयारीत असलेले मनोज जरांगे-पाटील यांची मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील आणि उद्योग मंत्री उदय सामंत आज मनोज जरांगे-पाटील यांची भेट घेणार असल्याची माहीती समोर आली आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या सोबत राधाकृष्ण विखे पाटील आणि उदय सामंत यांची भेट अहिल्यानगर किंवा पुणे येथे होणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

# गणपती बाप्पा : विघ्नहर्ता ते मंगलकर्ता

गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी गणेश याचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीला झाला असे मानले जाते. गणेश चतुर्थी या दिवसला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा शिवा असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे. स्त्रीमनाचे लोकदैवत असे ही श्री गणेशाला मानतात. गणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते. पत्रकारितेच्या इतिहासातील प्रखर तेजस्वी सूर्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या नांवे 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकारांना मिळतो. याचाच अर्थ असा लो. टिळकांच्या राष्ट्रभक्ति, लोकशक्ति आणि अन्याय मुक्तिला वाहिलेल्या ओजस्वी पत्रकारितेचे परंपरा आजही अखंड अविरत चालू आहे असाच होतो.

लोकमान्य टिळक हे ब्रिटिश सरकार बद्दल लोकांच्या मनात असंतोष निर्माण करणारे नेते म्हणून एकीकडे कार्य करीत होते. त्याचवेळी त्यांचा आवडत्या विषयांचा अभ्यासही चालू होता. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर सामाजिक परिस्थितीवर आणि प्रासंगिक घटनांवर 'केसरी'तून लेख करतानांही टिळकांनी आर्यांचे वस्तिस्थान 'ओरायन' शास्त्रीय पंचांग 'गितारहस्य' असे ग्रंथ लिहून आपल्या अभ्यासाचा परिचय घडविला. यापुढील काळात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नावरुन टिळक व आगरकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळकांनी १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक, सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढयाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सावाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक तत्व मनावर ठासविण्यासाठी काही प्रतिके सांगीतलेली आहेत. आम्हाला बाप्पा तू सद्सदविवेक बुध्दीचे प्रतिक वाटतोस. चांगल्या वाईटाचा सत्य-असत्याचा, पाप-पुण्याचा निवाडा करण्याची क्षमता देणारा तू देव आहेस. म्हणुनच तुला बुध्दीदाता म्हटले जाते. आज समाजाला या सद्सद्विवेक बुध्दीदात्या श्री गणेशाची पूर्वी कधी नव्हती एवढी आज गरज आहे. कारण आजवर नव्हता एवढा समाज अध: पतनाच्या उंबरठयावर उभा आहे. तुझ्यापुढे उभे राहिल्यावर माणसाच्या मनातल्या सद्भावना, सहानुभुती, सहृदयता, सज्जनता, सद्विचार, समभावना, सहभावना जाग्या होतात आणि तो 'मी' ऐवजी 'आपण' 'माझे' ऐवजी 'आपले' असा विचार करायला आपण प्रवृत्त होतो, हेच तुझे अवतार कार्य आहे.

भारतीय संस्कृतीत मूर्ती पूजाही एक थोर आणि मधुर अशी कल्पना आहे. माणसाला स्वत:चा उतरोत्तर अधिक विकास करुन घेता यावा म्हणुन जी



अनेक साधने भारतीय संस्कृतीने निर्माण केली, त्यातील एक आहे मूर्तीपूजा. मनुष्य प्राणी हा जन्मत: च विभूती पूजक आहे. आपल्या पेक्षा जे मोठे आहेत, त्यांचे आपण कौतूक करतो. आपल्याहून जे थोर आहेत बुध्दीने, प्रतिमेने, विचाराने महान आहेत त्यांची पूजा करावी असे माणसाला वाटते. ही पूजा आपण त्यांच्या आदर्शाची करतो, म्हणूनच त्या आदर्शाचे अनुकरण करण्याची प्रेरणा मनाला कार्य प्रवृत्त करते.

बाप्पा! तुझ्या आगमनानं आज सारं महाराष्ट्र राज्य रोमांचित, हर्ष भरित झालं आहे. खरोखरंच राज्याची काही पुण्याई आहे, म्हणुन संभवामि, युगे-युगे असे म्हणत. हजार पाचशे वर्षातून केव्हा तरी एकदा अवतार घेणारा परमेश्वर, दरवर्षी नित्य-नेमाने तुझ्या रुपाने या राज्यात अवतरतो. तेव्हा गहिवरुन येतं, तुझ्या नुसत्या दर्शनाने पोर्णिमेच्या चंद्राला पाहुन सागराला भरती यावी, तशी जन सागराला उचंबळुन भावनांची भरती येते. तुझ्या नुसत्याना मोच्चाराने जीवनातील दुखः संकटे, विघ्ने, अडचणी, प्रश्न, समस्यायांना सामोरे जाण्याची शक्ति-स्फुर्ती लाभते. तुझ्या नामस्मरणात अपारसाम आहे. भारतीय संस्कृतीचे मांगल्य, तुझ्या मुर्तीत एकवटलेले आहे. उत्तुंग आणि भव्य तुझ्या मुर्तीमध्ये आम्हाला हिमालयाच्या गिरी शिखरावरील शिव, कन्याकुमारीच्या तेजस्विनीचे सौंदर्य आणि वेद-उपनिषद-रामायण-महाभारतातील, सत्याचा म्हणजे सत्य-शिव-सुंदरतेचा प्रत्यय येतो. शिवाची शक्ति, सत्त्याचे सामर्थ्य आणि सौंदर्यातील ममत्व तुझ्या ठायी सामावलेले आहे. म्हणुनच तु भक्तांच्या नवसाला पावतोस, त्यांची मनोकामना पूर्ण करतोस, त्यांच्यावरील संकटाचे निवारण करतोस कारण तू जगज्येठी आहेस, तूच कर्ता-करवीता आहेस.

तुझ्या ठायी, ज्ञान-भक्ति आणि कर्मयांचा हृदय यंगम संगम आहे. तू खरा उदारदाता आहेस, मेघ जसे सारे पाणी देऊन टाकतात, झाडे-फळे देऊन टाकतात, फुले सुगंध देऊन टाकतात, नद्या ओलावा देऊन टाकतात, सुर्य-चंद्रप्रकाश देतात. तूही 'जो-जो वांछिले, तो तेलाहो' म्हणत साऱ्या भक्तांची इच्छापूर्ती करतोस. तू समाजाती लदंभ, आळस, अज्ञान, रुढी, भेद्-भाव, उच्च निंच पणा, वौमनस्य, दारिद्र्य, दु:ख, दैन्य, दुबळेपणा, भ्याडपणा दुर व्हावा. यासाठी तुझ्या विचारांचे, प्रेरणांचे अधिष्ठान, ही आजच्या समाजाची गरज आहे.

तुझ्या आगमनाने राज्याचे रुपांतर दहा दिवसांकरीता अक्षरश: तिर्थक्षेत्रात होते, अख्खा महाराष्ट्र ढवळून निघतो. सारेजण धर्म-भाषा, जाती-पंथ प्रदेश असे सारे भेद विसरुन तुझ्या दर्शनाच्या रांगेत 'भाविक' येतो, या एकाच जातीचे असतात. मनाची क्षुद्रता गळून पडलेली असते, जीवनाला सुंदर करणारे आणि मनाला सुखी करणारे असे ते रुप बाप्पा सर्वांच्यापुढे असते. दु:खाचा, समस्या, संकटाचा विसर पडलेला असता. आनंद, उत्साह, चैतन्य यांनी रोम-रोम पुलकित झालेला असतो. एका तेजाची उपासना आपण करीत आहोत, या अनुभवातून सारे गणेश भक्त तुझ्या सानिध्यात आल्यावर जात असतात. तू बुध्दीचा देव आहेस, परमेश्वर म्हणजे ज्ञान अशी आमची भारतीय संस्कृती सांगते. आम्ही सारे आस्तिक आहोत. कारण आमची तुझ्या जागृत अस्तित्वावर श्रध्दा आहेत. पण तुझे सामर्थ्य असे अगाध आहे की, तुझ्या दर्शनाने नास्तिकांचे ही रुपांतर आस्तिकात होईल. पाप्याला आपल्या पापाची लाज वाटेल, भ्रष्टाचा ज्याला शरम वाटेल हा तुझा महिमा आहे, म्हणुन तू आमच्यासाठी वरदान आहेस. जेव्हा आम्ही पाहतो, तेव्हा गणेशोत्सव, सुरु करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या स्वप्नांची पूर्ती बाप्पा तूझे सेवक, सामाजिक बांधिलकेच्या भूमिकेतून करतांना पाहून आम्हा भक्तांचा हात अधिक देण्यासाठी आणि ऋण फेडण्यासाठी उतावीळ होतो.



अयोग्य कर्मापासून रोखतेही, मूर्ती-पूजा हे मानसीक, बौध्दीक विकासाचे साधन हजारो वर्षापासून आहे. म्हणूनच बाप्पा तुझे 'अस्तित्व' चिरंतन आहे. हे ठाऊक असुनही आम्ही गणेश चतुर्थीला तुझी मूर्ती आनंदाने, अभिमानाने मिरवत देहभान विसरुन, गात-नाचत दहा दिवसांकरीता आणतो, आणि प्राणांच्या ज्योती करुन तुझ्या तेजाची आरती करतो. त्यासाठी आम्हाला तू मूर्तीरुपात हवा असतोस. तू विराट विश्वंभर आहेस, पण आम्ही तूझे पाईक आहोत. आमचे सर्व संकटापासुन ती येण्या आधीच रक्षण-निवारण कर आम्हाला सुख-समाधान, मन: शांती, आरोग्य, समृध्दि, समता-बंधुता-न्याय लाभू दे, हीच तुझ्या चरणी प्रार्थना!

**– प्रवीण बागडे,**
**जरीपटका, नागपूर –१४**
**भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९**

# धम्माचा उगम कसा होतो ?



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मदीक्षा दिल्यानंतर भारतातील पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्या लाखों लोकांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला आहे. या बौद्ध अनुयायांनी बौद्ध धम्माचे बाह्य किंवा व्यावहारिक रूप बऱ्यापैकी अंगिकारले आहे. मात्र धम्माच्या तात्त्विक स्वरूपाची आओळख होण्यासाठी आवश्यक अशी धम्मचर्चा अभावानेच होते. वर्षावासाच्या काळात बहुसंख्य बौद्ध अनुयायी विहारात जाऊन बुद्धाची पूजा करणे, पाली गाथांचे पठन करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथाचे सामूहिक वाचन करणे, काही व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित करणे यासारखे उपक्रम राबवितांना दिसतात. यातून धम्माविषयी आस्था जरूर निर्माण होते. मात्र धम्माच्या तत्त्वाची सखोल माहिती क्वचितच मिळते. ही सखोल माहिती प्राप्त होण्यासाठी व्यक्तिमध्ये धम्माचा उगम कसा होतो ? या प्रश्नांची चिकित्सा निश्चितच उपयोगी पडेल.

अत्त'' आणि अनत्त''

बुद्धाच्या तत्त्वज्ञानानुसार व्यक्ती हा नामरूप यांनी बनलेला असतो. यामध्ये नाम म्हणजे मन (ळपव यामध्ये भावना, विचार, चेतना इत्यादी बाबी येतात) आणि रूप म्हणजे व्यक्तीचे बाह्य स्वरूप यामध्ये शरीर आणि इंद्रिये यांचा समावेश होतो. जेव्हा नामरूप अस्तित्वात येते तेव्हाच व्यक्तीमध्ये स्व'' ची जाणीव विकसित होते. बुद्धाने या 'स्व ' ला '' अत्त असे संबोधन दिले आहे. मनात उद्भवणाऱ्या अंतर्गत किंवा सभोवताल अस्तित्वात असलेल्या बाह्य कारणांच्या परिणामाला प्रतिसाद देऊन हा स्व निर्णय घेतो,निवड करतो. व्यक्तीचे मन विकारग्रस्त असेल तर स्व'' चे निर्णय आणि निवड यामुळे दु:खनिर्मिती होत राहते. जोपर्यंत व्यक्तीच्या हातून स्वत:साठी आणि इतरांसाठी दु:खनिर्मिती होत राहते तोपर्यंत व्यक्तीमध्ये धम्माचा उगम आणि विकास होत नाही. म्हणूनच धम्मवान व्यक्ती बनण्यासाठी आणि धम्माच्या विकासात योगदान देण्यासाठी मन स्व'' किंवा '' अत्त च्या पुढे जाऊन विकाररहित अनत्त'' स्वरूप होणे आवश्यक आहे.

नामरूपाच्या अस्तित्वाची तीन लक्षणे .

बौद्ध तत्त्वज्ञानानुसार कोणतेही नामरूप जेव्हा अस्तित्वात येते तेव्हा ते सार्वत्रिक अशा तीन वैशिष्ट्यांनी युक्त असते. ती वैशिष्ट्ये अशी. १) अनित्यता २) दु:ख आणि ३) स्व-रहितता (अनत्त) ही तीनही वैशिष्ट्ये एकमेकांशी संलग्न आणि परस्परावलंबी असतात. ही वैशिष्ट्ये आहेत विश्वात अस्तित्वात असलेल्या सजीवप्राणी आणि निर्जीव वस्तू तसेच शारीरिक आणि मानसिक अनुभूती किंवा संस्कार यांना सारख्याच प्रकारे लागू आहेत. यासंदर्भात बुद्धाने म्हटले आहे की, सर्व संस्कार हे अनित्य आहेत, सर्व प्रकारच्या संस्कारातुन उद्भवणारे परिणाम हे दु:ख आहेत, धम्म हा स्व-रहित आहे. (सब्बे संखारा अनिच्च, सब्बे संखारा दु:ख, सब्बे धम्म अनत्त) याचाच अर्थ असा की, जे काही अनित्य म्हणजेच परिवर्तनीय आहे ते दु:ख निर्मिती करण्यास कारणीभूत ठरते. विश्वाचा हा नियम लक्षात घेऊन जो कोणी स्वत:मधील मी, माझे, माझ्यासाठी, माझ्यामुळे, या संस्काराचा लोप करण्यात सफल होतो तो स्व-रहित म्हणजेच अनत्त'' होतो. जेव्हा व्यक्ति स्वत:मधील संस्काराचा लोप करून विश्वाकडे तटस्थपणे पहायला लागतो तेव्हाच तो ज्ञानप्राप्तीच्या (एपश्रळसहींशपाशपीं) मार्गावर चालू लागतो.

यासंदर्भात बुद्धाने अनत्तलक्षण सुत्त ( संयुत्त निकाय २२.५९) मध्ये स्पष्ट केले आहे की,

रूपं, भिक्खवे, अनत्ता वेदना अनत्ता सञ्ञा अनत्ता संस्कार अनत्ता विज्ञानं अनत्ता।

शरीर (रूप), अनुभव (वेदना), संकल्पना (संज्ञा), मनावरील संस्कार (संस्कार), आणि चेतना (विज्ञान) हे सर्व अनित्य आहेत. जेव्हा व्यक्तीला संसाराच्या या अनित्य स्वरूपाची जाणीव होईल आणि ही जाणीव अधिकाधिक विकसित होईल तसतसा व्यक्ती अनत्त'' स्वरूप होत जाईल. एकदा का व्यक्ती अनत्त'' स्वरूप झाला तर, हा मी आहे,हे माझे आहे, हे माझे शरीर आहे, हे माझे आप्तस्वकीय आहेत, ही माझी संपत्ती आहे या जाणिवांना काहीही अर्थ उरणार नाही आणि येथेच मनुष्याच्या जीवनात धम्माचा उगम होऊन तो निब्बाणाच्या मार्गावर चालू लागेल.

धम्मवान बनण्यासाठी सम्यक दृष्टी प्राप्त होणे आवश्यक

जेव्हा व्यक्तीच्या मनातील स्व चा लोप होत नाही तेव्हा व्यक्तिमध्ये अनेक प्रकारचे भ्रम किंवा विकृती (विपल्लसं) विद्यमान राहतात. यामुळे त्याची वैचारिकता बाधित होते. वैचारिकता बाधित असेल तर व्यक्ती, जी बाब अनाकर्षक आहे तिला आकर्षक म्हणून पाहतो. जी बाब अनित्य आहे तिला नित्य म्हणून पाहतो. जी बाब दु:खदायी किंवा दु:खकारक आहे तिला आनंददायी म्हणून पाहतो. जे अनत्त'' आहे ते अत्त'' म्हणून पाहतो. याचे प्रमुख कारण व्यक्ति स्वत:ला केंद्रस्थानी ठेऊन ( बुद्धाने यास सक्कायदिट्ठी असे म्हंटले आहे ) संपूर्ण विश्वाकडे पाहत असतो हे आहे. संपूर्ण विश्वाकडे भ्रमरहित किंवा विकृतीरहित दृष्टीने पाहण्याची वृत्ती वाढीस लागण्यासाठी व्यक्तीच्या मनात उद्भवणाऱ्या १) कामउपादान २) दिट्ठीउपादान ३) सिलब्बतुपादान ४)अत्तावधुपादानं या चारही प्रकारच्या उपादानांना योग्य प्रकारे नियंत्रणात आणून मनाचे स्थिरीकरण करणे ( समता ) व नवीन संस्काराची उत्पत्ती रोखणे याद्वारे सम्यक दृष्टी प्राप्त करणे आवश्यक असते. अशी दृष्टि प्राप्त होणे म्हणजेच व्यक्तीच्या मनात धम्माचा उदय होणे होय.

**– सुनील खोबरागडे**

# मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त देशभर क्रीडा महोत्सव : केंद्रीय मंत्री डॉ. मनसूख मांडवीय

मुंबई : पद्मभूषण मेजर ध्यानचंद सिंह यांच्या जयंतीनिमित्त २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान देशभर राष्ट्रीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा भावना आणि ऐक्याच्या या उत्सवात प्रत्येक नागरिकाने किमान एक तास खेळासाठी द्यावा, असे आवाहन केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी केले आहे.

या क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून देशात क्रीडा परिसंस्था उभारण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. युवक कल्याण व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या क्रीडा महोत्सवाच्या आयोजनाबाबत दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मंत्रालयातून क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, उपसचिव श्री. सुनील पांढरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. तसेच विविध राज्यांचे क्रीडा मंत्री आणि सचिव दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

राज्यात तालुका स्तरावरील तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील तरुणांनाही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी प्रोत्साहन मिळणार असल्याचा विश्वास क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांनी यावेळी व्यक्त केला.

केंद्रीय क्रीडा मंत्री मांडवीय यांनी सांगितले की, देशात मजबूत स्पोर्ट्स इको सिस्टम निर्माण करून २०३६ मध्ये ऑलिंपिकचे यशस्वी आयोजन हे शासनाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील खेळाडूंपर्यंत पोहोचणे, त्यांना संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या क्रीडा महोत्सवात जिल्हा, विद्यापीठ, महाविद्यालय व स्टेडियम स्तरावर विविध क्रीडा प्रकारांचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये क्रीडा स्पर्धा, वादविवाद व चर्चासत्रे, तज्ज्ञ आणि क्रीडा क्षेत्रातील सेलिब्रिटींचा सहभाग असणार आहे. योग, बुद्धिबळासारख्या मानसिक खेळांना प्रोत्साहन देण्यात येणार असून, ३१ ऑगस्ट रोजी सांगता समारोपादिवशी सायकलिंग उपक्रम देशभर घेण्यात येणार आहे.

खेळ ही केवळ मैदानी मर्यादा नसून आरोग्य, फिटनेस आणि राष्ट्रीय एकतेचे प्रतीक आहे. प्रत्येकाने मैदानी खेळ, योगा किंवा सायकलिंगमध्ये सहभाग घेऊन फिट इंडिया चळवळीत योगदान द्यावे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची 'विकसित भारत' ही संकल्पना साकारण्यासाठी क्रीडा क्षेत्राची मोठी भूमिका आहे, असे केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांनी अधोरेखित केले.

# प्रधानमंत्री मातृवंदना योजनेची राज्यात यशस्वी वाटचाल

मुंबई : गर्भवती महिला व स्तनदा मातेचे पोषण आणि आरोग्य जपल्यास पुढील पिढी सुदृढ होईल. तसेच मुलींच्या जन्माबाबत सकारात्मकता वाढावी या उद्देशाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येते. एकात्मिक बाल विकास प्रकल्पामार्फत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या यशस्वी वाटचालीतून मातांचे आरोग्य, कुटुंबाचा आनंद आणि समाजाचा विकास साधत राज्याचा विकास साधता येणार आहे.

प्रधानमंत्री मातृवंदना योजनेअंतर्गत ३६ जिल्ह्यांचे जिल्हा नोडल अधिकारी आणि बालविकास प्रकल्प अधिकारी तसेच क्षेत्रीय स्तरावरच्या मुख्य सेविकांचे मॅपिंग १०० टक्के पूर्ण झाले आहे. या वर्षासाठी ४० हजार नोंदणी करण्यात आली आहे. उर्वरित उद्दीष्ट लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने २०२५-२६ वर्षासाठी ५ लाख ७० हजार उद्दिष्ट दिले असून, ते कालमर्यादेत नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येत आहे. यासाठी योजनेअंतर्गत असेलल्या नियमांची पूर्तता आणि प्रलंबित महिला लाभार्थ्यांना त्यांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच २०१७ पासून ज्या महिला योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढे आल्या नाहीत, अशा महिलांपर्यंत अंगणवाडी महिला अथवा आशा वर्कर यांच्या सहायाने लाभ पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाकडून राज्यात ही योजना राबविण्यात येत होती. त्यांनतर २०१७ पासून ही योजना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविली जात होती. २०१७ पासून आजतागायत ४६ लाख २९ हजार ११९ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. जिल्ह्यांच्या नोडल अधिकाऱ्यांमार्फत ३६ जिल्ह्यात, ५५३ प्रकल्पाचे बाल विकास प्रकल्प अधिकारी, ३,८९९ बीट लेवलच्या मुख्य सेविकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. मॅपिंगचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. लवकरच अंगणवाडी स्तरावरील मॅपिंग पूर्ण करण्यात येणार आहे. गर्भवती व स्तनदा मातांना सकस आहार देणे, गरोदरपणात काम थांबल्यामुळे आर्थिक नुकसानीसाठी मजुरी भरपाई देणे, दुसरे मूल हे मुलगी जन्मास आले असेल तर अतिरिक्त आर्थिक प्रोत्साहन देऊन मुलीबद्दल सकारात्मक दृष्टीकोनास प्रोत्साहन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. मुलीच्या जन्माबद्दल सकारात्मक दृष्टीकोन वाढावा यासाठी गर्भधारणेच्या नोंदणीपासून सहा महिन्याच्या आत प्रसूतीपूर्व तपासणीसाठी महिलेला ३ हजार रूपये देण्यात येतात. तर बाळाच्या जन्मानोंदणी नंतर दोन हजार रूपये देण्यात येतात. म्हणजेच पहिल्या अपत्यासाठी पाच हजार रूपये देण्यात येतात. दुसरे अपत्य मुलगी असल्यास तिच्या जन्मानंतर सहा हजार रूपये देण्यात येतात.

ज्या कुटुबाचे उत्पन्न प्रतिवर्ष आठ लाख पेक्षा कमी असेल, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती, अंशत: ४० टक्के किंवा पूर्ण अपंग, बीपीएल शिधापत्रिकाधारक, आयुष्यमान भारत अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत लाभार्थी , ई-श्रम कार्ड धारक, किसान सन्मान निधी अंतर्गत लाभार्थी शेतकरी, मनरेगा जॉब कार्डधारक, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा कार्यकर्ती, अन्नसुरक्षा कायदा २०१३ अंतर्गत रेशनींग कार्डधारक यापैकी किमान एक दस्ताऐवज असल्यास या योजनेचा लाभ घेता येतो. महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या अंगणवाडी केंद्रात संपर्क साधायचा आहे किंवा प्राथमिक आरोग्य केंद्र, किंवा उपजिल्हा किंवा जिल्हा रूग्णालयात अर्ज करू शकतात.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर शहर पोलीस स्टेशनची सराईत गुन्हेगारावर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज रोजी पंढरपूर उपविभागाचे सह पोलिस अधीक्षक श्री प्रशांत सगळे साहेब (भा.पो.से.) वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजीत घोडके साहेब यांच्या उपस्थितीत गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोंबिंग ऑपरेशन राबवण्यात आले यामध्ये पंढरपूर सुरू असलेल्या बेकायदेशीरपणे वयत्यासह फिरवून दहशत घडवणाऱ्यामुळे अभिलेखावरील सराईत गुन्हेगारावर परिणामकारक धडक धडक कारवाई करून त्यांची दहशत मोडीत काढण्याकरिता त्यांची धरपकड करून पंढरपूर शहर पोलीस




ठाणे येथे आणून पंढरपूर उपविभागाचे सह पोलीस अधीक्षक श्रीप्रशांत डगळे साहेब(भा.पो.से.) त्यांनी ठोस व कडक कारवाई केली यापुढे भविष्यात पंढरपूर शहर व परिसरातील सामान्य लोकांमध्ये कोणीही दहशत वाजवण्याचा प्रयत्न केल्यास सदर गुन्हेगारावर मोका, एम पी डी ए ,तडीपार सारखी कडक कारवाई करून गुन्हेगारी कृत्य करणाऱ्याच्या बिमोड करण्यात येईल. तसेच बरेच तरुण इंस्टाग्राम युट्यब व सोशल मीडियावर गुन्हेगार व गुन्ह्याचे व्हिडिओ वायरल करून पसरवीत असलेले असे प्रसार करू नये असा इशारा दिला आहे. आगामी गणेश उत्सव, नवरात्र महोत्सव, भक्तिमय भय्यूक्त व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी यापुढेही वेळोवेळी ठोस कारवाई अशा प्रकारची करण्यात येणार आहे असे सह पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळेसो. यांनी सांगितले.

सदरचे बोंबिंग ऑपरेशन०२ पांडुरंगाच्या चार चाकी पिकप,०५ मोटरसायकली तसेच पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे अभिलेखा वरील २५ सराईत गुन्हेगार यांना पोलीस ठाणे येथे आणून त्यांच्यावर प्रलंबित कायद्यान्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी सो. अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर सो. सह पोलीस अधीक्षक श्री प्रशांत डगळे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे, श्री विश्वजीत घोडके सो. यांच्या उपस्थितीत पंढरपूर शहर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेने प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, सपोनि. भारत वाघे,पोस इ. श्रीकांत घुगरकर, श्रेणी पोसई राजेश गोसावी, दप्तरी कल्याण ढवणे, पोलीस नाईक सचिन इंगळे, तसेच सिग्मा गोडसे, सचिन हेंबाडे प्रसाद आवटी, विठ्ठल विभूते शहाजी मंडले, बजरंग बिचुकले व तसेच पंढरपूर शहर शाखेचे वाहतूक शाखेची अंमलदार पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्या अंमलदार यांनी काम केले.

# गणेशोत्सव कायद्याचे पालन करून आनंदात साजरा करा : ऋषिकेश धर्माधिकारी पोलीस निरीक्षक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ विनायक गायकवाड : पुरंदर ::सासवड पोलीस स्टेशन च्या वतीने सासवड शहरामध्ये गणेश उत्सवाच्या अनुषंगाने पोलिसांचे रूटमार्च संचलन करण्यात आले, पोलीस निरीक्षक ऋषिकेश धर्माधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनवणे,यांच्या मार्गदर्शनाखाली सदर संचालनाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील, पोलीस उपनिरीक्षक नारायण खंडागळे,सासवड पोलीस स्टेशनचे अंमलदार, कर्मचारी,होमगार्ड इत्यादींचा समावेश त्यामध्ये होता गणेश



उत्सवामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सदर संचल नाचे आयोजन करण्यात आले होते.

श्री ऋषिकेश धर्माधिकारी सासवड पोलीस स्टेशन यांनी पुरंदर मधील व सासवड शहरांमधील गणेश भक्त व गणेशोत्सवातील मंडळांना खालील प्रमाणे आव्हान केले आहे.

१) मंडळांनी देखावे सादर करताना दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल भावना दुखवल्या जातील अशा पद्धतीचे कोणतेही देखावे,फ्लेक्स बॅनर लावू नयेत

२) मंडळांनी पारंपारिक वाद्य याच्यावर जास्त भर द्यावा डीजे बंदी असल्याने डीजे चा वापर करू नये.

३) देखाव्यांमध्ये लेझर लाईटचा वापर करू नये ते आरोग्यासाठी हानिकारक आहे, गर्दी मध्ये फटाके वाजवू नये

४) मिरवणुकीमध्ये गुलालाचा वापर कमी करा ते सुद्धा आरोग्यासाठी अपायकारक आहे

५) गुंड प्रवृत्तीच्या लोकांना गणेशोत्सवामध्ये बोला उ नका,

सर्व गणेशभक्त व गणेशोत्सव मंडळांनी गणेशोत्सवा मध्ये कायद्याचे पालन करून आनंदात साजरा करावा.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर येथे श्री गणेशाची प्रतिष्ठापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आज श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे गणेशोत्सवाच्या निमित्ताने गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. या मंगलप्रसंगी समितीचे लेखाधिकारी श्री. मुकेश अनेचा यांच्या हस्ते गणेश पूजन व स्थापना विधी संपन्न झाला.

गणेश पूजनावेळी समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, तसेच मंदिरे समितीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने मंत्रोच्चार व धार्मिक वातावरणात हा सोहळा पार पडला.


समितीच्या वतीने



गणेशोत्सवाच्या या पावन पर्वानिमित्त सर्व भाविक, नागरिक आणि भक्त मंडळींना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. श्री गणरायांच्या आशीर्वादाने सर्वांच्या आयुष्यात सुख, शांती व समृद्धी नांदो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

गणेशोत्सव काळात श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजन करण्यात येणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# टाकळीवाडीच्या कुंभारवाड्यात गणेश मूर्ती स्थापन करण्यासाठी भाविक भक्तांची मोठी गर्दी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील कुंभारवाड्यात लहान मूर्ती पासून १२ फुटापर्यंतच्या मूर्ती आकर्षक अशा विविध देवदेवतांच्या रूपातील मिळत असतात.

असंख्य मंडळाच्या कार्यकर्त्यांनी आज गणेश मूर्ती स्थापन करण्यासाठी कुंभारवाडात झुंबड उडाली होती.

टाकळीवाडी च्या गणेश मूर्ती कर्नाटकातील निपाणी तालुका, चिकोडी तालुका, तसेच महाराष्ट्रातील कागल, शिरोळ, हातकलंगडे तालुका या तालुक्यात प्रसिद्ध आहेत.


टाकळीवाडी येथील श्री गणेश मूर्तींना फार मोठी मागणी वाढत आहे.

# भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी ई-पीक नोंदणी ठरतेय डोकेदुखी : ॲप हाताळताना असंख्य अडचणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : प्रधानमंत्री पिक विमा घेण्यासाठी शेतकऱ्यांना शेतात जाऊन ई-पिक नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले मात्र शासनाने उपलब्ध करून दिलेला -पिक पाहणी अँप भिवंडी तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांना हाताळता येत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

प्रधानमंत्री पिक योजनेसह नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनाने मागील तीन वर्षांपासून खरीप व रब्बी हंगामात लागवड केलेल्या पिकांची ई-पिक पाहणी बंधनकारक केली आहे. खरीप हंगामात लागवड केलेल्या पिकांच्या



ई-पिक पाहणीच्या नोंदी अभियानास ऑगस्ट पासुन प्रारंभ झाला.असुन १४ सप्टेंबरपर्यंत नोंदणीची अंतीम मुदत दीली आहे. त्यामुळे भिंवडी तालुक्यातील शेतकरी दररोज शेतात ई-पिक नोंदणी करण्यासाठी मोबाईल अँपशी झगडावे लागत आहे तसेच जागेवर गेल्यावर मोबाईल रेंज नसणे, अँप सुरू होण्यास विलंब लागणे, शेतात उभे राहुन ई-पिक नोंदणी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यांना अँप व्यवस्थित उघडता न येणे, धीम्या गतीने इंटरनेट सेवा असल्याने सतत लोंडीग, ऑनलाईन प्रक्रीया नॉलेज नसणे अशा अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. तसेच गुगल मॅपमध्ये शेतापासुन शेतापासुन गट नंबर सर्वे नंबर दुर दाखवले जात आहे. त्यामुळे त्या शेतीची नोंदणी पुर्ण होत नाही प्रधानमंत्री पिक विमा योजना अॅग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी दिल्लीमार्फत राबवली जात आहे या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ वेळेत मिळण्यास अडथळा निर्माण झाला आहे. या सर्व अडचणीमुळे ई-पिक नोंदणी वेळेत पुर्ण न झाल्यास पिक विमा व ईतर योंजनापांसुन शेतकरी वंचित राहण्याची शक्यता असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. शेतकरी बांधवांनी वेळेवर ई-पिक पाहणी पुर्ण न केल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे शासनाने तातडीने सोपी व सुलभ पध्दत उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी भिंवडी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी केली आहे.

**खरीप हंगाम साठी ऑनलाईन पध्दतीने पीक नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असुन इंटरनेट कमी गती, अँपमध्ये वारंवार येणाऱ्या तांत्रिक अडचणी व शेतकऱ्यांना अँप हाताळण्यासाठी प्रशिक्षणाचा अभाव, अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड फोन नसणे, सर्वर डाऊन असणे यामुळे शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया रखडत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना पिक विमा योजनेसह विविध योजनांपासून वंचित रहावे लागणार आहे.**

# सात लाखांची फसवणूक; एकावर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : सात लाखांचे फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १७ जानेवारी २०२४ ते जानेवारी २०२५ दरम्यान औसे वस्ती आमराई येथे घडली.याप्रकरणी अनुराधा दिलीप फंड (वय-५३,रा.औसे वस्ती,लक्ष्मी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून नागेश उर्फ आशा प्रभाकर मेनसंगे (रा.औसे वस्ती, सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी याने फिर्यादीस मला जागा खरेदीने घ्यायचे आहे.तुमचे पैसे काही दिवसांमध्ये परत करतो.तुम्ही माझ्याकडे भिशी जमा करा, वेळेत तुम्हाला पैशाची मदत होईल. प्लॉट जागा विकत घेण्याकरिता पैसे कमी पडत आहे.मला पैशाची गरज आहे. तुमचे पैसे लवकर जमा करतो. असा विश्वास दाखवून फिर्यादी यांच्याकडून व तसेच फिर्यादी यांच्या परिसरात राहणाऱ्या मित्रांकडून सात लाख वीस हजार रुपयांची रक्कम जमवून एक रक्कम परत न करता फसवणूक केली आहे.असे फिर्याद म्हटले आहे. पुढील तपास पोसई.पाटोळे हे करीत आहेत.

# पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण; पतीसह चौघावर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पैसे मागण्याच्या कारणावरून अपमानित करत दमदाटी करून शारीरिक मानसिक छळ करत मारहाण केल्याची फिर्याद पूजा प्रशांत कोरे (वय-२८,रा.मल्लिकार्जुन नगर, अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती प्रशांत, सासरे चंद्रकांत, सासू मल्लम्मा, दिर बसवराज (रा. तळवळ,ता. अक्कलकोट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना सन २०११ ते १७ मे २०२५ रोजी दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मुजावर हे करीत आहेत.

# राष्ट्रवादीकडून बोहाळी ग्रामपंचायतच्या नूतन उपसरपंच माधवी कल्याण कुसुमडे यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील बोहाळी ग्राम पंचायतच्या उपसरपंचपदी माधवी कल्याण कुसुमडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी यशाचे शिल्पकार ठरलेल्या कल्याण कुसुमडे यांचाही सन्मान करण्यात आला.




यावेळी विठ्ठल साखर कारखान्याची माजी संचालक शशिकांत बागल तसेच संजय पवार, बापू मेलगे, संजय बागल, ज्योतीराम फाटे, डॉ. माणिक मस्के, डॉ. रमेश फाटे, उमेश फाटे, वैजनाथ चौरे, संतोष पुणेकर, ओंकार कथले, शुभम फाटे, शशांक फाटे, समाधान बागल, किशोर नप्ते, शरद थिटे, ऋषिकेश बागल, गणेश बागल, मोहित कुमार उपस्थित होते.

**ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रसाने यांची माहिती**

# श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, अनंत विभूषित सद्गुरु श्री रामा नुजाचार्य श्री झांडिया पिताजीश्वर श्री १००८ प. स्वामी घनश्याम महाराज त्रिकूट मध्यप्रदेश यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा व सायंकाळी विद्युत रोषणाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, तरुण मंडळ यांच्या वतीने ट्रस्टच्या १३३ व्या गणेशोत्सवात केरळमधील श्री पद्मनाभ स्वामी मंदिराची प्रतिकृती साकारण्यात येत आहे. गणेश चतुर्थीला बुधवार, दिनांक २७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजून अकरा मिनिटांनी मध्य प्रदेश चित्रकूट येथील अनंत श्री विभूषित सद्गुरु श्री रामानुजाचार्य श्री झालिया पिठाधिश्वर श्री श्री १००८ प.पू. स्वामी घनश्याम चार्य महाराज यांच्या हस्ते श्रीची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. तर मंदिरावरील विद्युत रोषणाचे उद्घाटन सायंकाळी सात वाजता होईल, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रसाने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रसाने, उपाध्यक्ष डॉक्टर रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रसाने, सह चिटणीस अमोल केदारी सुवर्ण एक तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतीश रसाने, सौरभ रायकर तुषार रायकर, मंगेश सूर्यवंशी, अमोल चव्हाण, विनायक रसाने यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोंबरजवळगे येथे अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी

## अक्कलकोटचे तहसीलदार यांना सर्व शेतकरी बांधवाकडून निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : डोंबरजवळगे. येथे अतिवृष्टी मुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे दखल घेऊन तात्काळ सर्व शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी शेतकरी व ग्रामस्थानी केली आहे.

अक्कलकोट तालुक्यातील मोजे,. डोंबरजवळगे येथे पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमणात नुकसान नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने भरपाई मिळावे अशी मागणी करणारे निवेदन अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांना देण्यात आले आहे

अक्कलकोट तालुक्यातील डोंबरजवळगे गावातील भागात गेल्या पाच ते सहा दिवसापासून मुसळधार पाऊस झाल्यामुळे या भागातील पीक पाण्याखाली गेल्याने . आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांचे हातातोंडाशी आलेले उडीद मूग सोयाबीन व इतर कडधान्ये पिकांचे असे मोठे नुकसान झाले आहे. शेतामध्ये तलाव चे पाणी शिरल्याने उडीद तुर अनेक पीक पाण्याखाली गेले आहेत. यामुळेच शेतकरी हवालदिल झाला असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान या अतिवृष्टी मुळे झाले आहे यामुळे तातडीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी या मागणीसाठी सर्व शेतकरी बांधव यांनी अक्कलकोटचे तहसीलदार यांना निवेदन दिले आहेत.

डोंबरजवळगे या गावातील व परिसरातील . शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसान ची भरपाई त्वरीत शासनाकडून मिळवून द्यावी म्हणून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

डोबरजवळगे या भागात सतत पाऊस पडत असल्याने सर्व पीकाचे मोठ्या प्रमाणे नुकसान झालेले आहे या भागातील सर्व शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी सर्व शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी डोंबरजवळगे. गावातील सर्व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## राजभवन येथे राज्यपालांच्या हस्ते गणरायाची प्रतिष्ठापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/विशेष प्रतिनिधी : गणेश चतुर्थी निमित्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी आज सकाळी राजभवन येथील आपल्या निवासस्थानी गणरायाची प्रतिष्ठापना केली. यावेळी राज्यपालांनी राजभवनातील अधिकारी व कर्मचारी यांचेसह गणरायाची आरती केली तसेच देशवासियांना गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठापना व आरतीला राजभवनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**नाशिक कारागृहातील कैद्यांनी तयार केली राजभवनातील मूर्ती**

राजभवनात प्रतिष्ठापित करण्यात आलेली गणेशमूर्ती शाडू मातीची असून ती नाशिक येथील केंद्रीय मध्यवर्ती कारागृहातील कैद्यांनी साकारली आहे. नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या संकल्पनेनुसार ही पर्यावरणपूरक मूर्ती तयार करण्यात आली व राजभवन येथे पाठविण्यात आली.

## पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२५, पंढरपूर नगरपरिषद व पंढरपूर पोलीस प्रशासन यांच्या वतीने आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**नाव नोंदणीची तारीख:**
**27 ऑगस्ट-5 सप्टेंबर 2025**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपरिषद व पंढरपूर पोलीस प्रशासन यांच्या वतीने स्वच्छ सुंदर हरित पंढरपूर ज्या संकल्पनेवर आधारित पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२५ आयोजित करण्यात आली आहे.

पंढरपूर शहरातील विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना याद्वारे आव्हान करण्यात येते की, या स्पर्धेत सहभागी व्हावी, आणि पर्यावरण स्वच्छता व जनजागृती सोबतच आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळावा.

सदर स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विजेत्या मंडळांसाठी आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून त्यासाठी प्रथम क्रमांक-रु.२१,०००/+सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र,

द्वितीय क्रमांक रु.१५,०००/-+सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र,

तृतीय क्रमांक-रु.१०,०००/-+सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच यासाठी स्पर्धेतील निकष असणार आहे ते पुढील प्रमाणे पर्यावरण पूरक मूर्ती व सजावट दोन्ही प्रदूषण मुक्त वातावरण, पारंपारिक वाद्याचा वापर, सामाजिक उपक्रम प्लास्टिक मुक्त जनजागृती, डस्टबिनचा वापर, वृक्षारोपण व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, पूजा निकषावर आधारित विजेता घोषित करण्यात येणार आहे.

यासाठी नाव नोंदणी ची तारीख २७ ऑगस्ट ते पाच सप्टेंबर २०२५ अशी राहील तर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लगेच नोंदणी करा यासाठी संपर्क अधटराव ९३७०८५३२८५, जोजारे, ७०२०२८६१४७, पवार (पोलीस हवालदार) ९८२३९९०७३२, तसेच ४० ७५/अ. भादुले चौक, पंढरपूर येथे जाऊन कार्यालयात नाव नोंदणी करू शकता,

Q.R. कोड स्कॅन चा देखील वापर करू शकता अशी माहिती दिली व आव्हान देखील पंढरपूर नगरपालिका व पंढरपूर पोलीस प्रशासन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या निवासस्थानी बाप्पांचे जल्लोषात आगमन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या शासकीय निवासस्थानी गणपती बाप्पांचे मंगलमय आणि उत्साही वातावरणात आगमन झाले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी इको-फ्रेंडली गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करून सपत्निक आरती केली व दर्शन घेतले.शहर व जिल्ह्यातील शेतकरी, नागरिक तसेच गणेशोत्सव मंडळांना श्री गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देताना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी डॉल्बीमुक्त वातावरणात पारंपरिक वाद्यांसह गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.

## किरकोळ कारणावरून मारहाण; दोघांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : किरकोळ कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २३ ऑगस्ट रोजी दुपारी पावणे पाच वाजण्याच्या दरम्यान मंगळवार पेठ येथे घडली. याप्रकरणी अनिल उमाकांत बुराडे (वय-४७,रा.पश्चिम मंगळवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून आनंद भिंगारे व धीरज भिंगारे (रा.पश्चिम मंगळवार पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,आनंद भिंगारे याने भाड्याच्या जागेची इलेक्ट्रिक मीटरची वायर बदलून द्या असे विचारले असता, त्यांनी फिर्यादी यांच्याशी हुज्जत घालून शिवीगाळ केली.त्यानंतर फिर्यादी घरी झोपले असता, फिर्यादी यांचा मुलगा समर्थ बुराडे यांना मनाला की काय झाले बाप्पा असे विचारल्यावर फिर्यादी त्यास ते जाऊ दे सोड मी ठीक आहे.मी त्यांना बोलतो असे म्हणून फिर्यादी बाथरूमला गेले असता,फिर्यादी यांचा मुलगा समर्थ हा घरमालकाच्या घरी जाऊन घर मालक आनंद भिंगारे याला बोलत असताना धीरज भिंगारे याने फिर्यादी यांच्या मुलाला हाता पायाने मारहाण करून टेबलावरील काच उचलून मारण्याचा प्रयत्न केला आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास मपोसई.शेख या करीत आहे.ी स्थापना करण्यात आली. या मंगलप्रसंगी समितीचे लेखाधिकारी श्री. मुकेश अनेचा यांच्या हस्ते गणेश पूजन व स्थापना विधी संपन्न झाला.

गणेश पूजनावेळी समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, तसेच मंदिरे समितीचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक पद्धतीने मंत्रोच्चार व धार्मिक वातावरणात हा सोहळा पार पडला.

समितीच्या वतीने गणेशोत्सवाच्या या पावन पर्वानिमित्त सर्व भाविक, नागरिक आणि भक्त मंडळींना हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. श्री गणरायांच्या आशीर्वादाने सर्वांच्या आयुष्यात सुख, शांती व समृद्धी नांदो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

गणेशोत्सव काळात श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजन करण्यात येणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.



## राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोकरे यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक तथा एस.बी.आय .ग्रुपचे अंबाबाई तालीम शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक व राज्य पत्रकार संघाचे संजय भोकरे यांना वाढदिवसानिमित्तने सत्कार करण्यात आला.

यावेळी दैनिक समर्थ गावकरी समूहाच्या वतीने संजय भोकरे यांच्या वाढदिवसानिमित्तने केलेल्या विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक गावकरीचे संपादक डॉक्टर विश्वास आरोटे, श्री नवनाथ जाधव, श्री संजय फुलसुंदर इत्यादी उपस्थित होते.

## श्री विठ्ठल रुक्मिणीस श्री गणेश चतुर्थी निमित्त अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल रुक्मिणीस श्री गणेश चतुर्थी निमित्त प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री विठ्ठला नाम हिऱ्यांचा, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्यांचे कंगन जोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, शिरपेच, मत्स्य जोड, तोडेजोड, तुळशीचे माळ, जवेची माठ, तसेच श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडेजोड, तानवंड तोंड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक जवे च्यामाळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्याची माळ, हाय कोल कंबरपट्टा, इत्यादी अलंकार श्री विठ्ठल रुक्मिणी परिधान करण्यात आले होते.

**निवासी आयुक्त आर. विमला यांच्या संकल्पनेतून ग्रामीण उद्योजकांना राष्ट्रीय व्यासपीठ**

# नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनात सातारा जिल्ह्याच्या स्वयंसहायता गटाच्या दालनाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे सातारा जिल्ह्यातील स्वयंसहायता गटांच्या (डक्क) उत्पादनांसाठी कायमस्वरूपी दालनाचे उद्घाटन आज निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी अपर निवासी आयुक्त निवा जैन व सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार उपस्थित होत्या.

यंदा १५ ऑगस्ट रोजी दिल्लीतील लाल किल्लयावर झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमासाठी सातारा जिल्ह्यातील लखपती दीदी, बचत गटाच्या प्रमुख आणि आत्मनिर्भर क्लस्टर लेव्हल फेडरेशन (उडऋ) पुरस्कार विजेत्या दीदी यांच्यासह २० महिलांनी सहभाग घेतला होता. या दौऱ्यादरम्यान त्यांनी महाराष्ट्र सदनात श्रीमती विमला यांची भेट घेऊन आपली हस्तकला, खाद्यपदार्थ आणि स्थानिक उत्पादने भेट म्हणून सादर केली होती. या भेटीत साताऱा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यशिनी नागराजन यांनी तयार केलेले निवेदन प्रतिनिधींमार्फत सुपूर्द केले होते, ज्यात बाजारपेठ आणि प्रदर्शनांमध्ये सहभागाची संधी तसेच आवश्यक समर्थनाची विनंती करण्यात आली होती. श्रीमती विमला यांनी या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत, या महिलांना त्यांची उत्पादने राष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते. त्याच आश्वासनाला प्रत्यक्ष रूप देत आज या दालनाचे उद्घाटन करण्यात आले.

सातारा जिल्ह्याच्या सांस्कृतिक आणि आर्थिक वारशाला राष्ट्रीय व्यासपीठावर नेण्याच्या उद्देशाने श्रीमती विमला यांच्या संकल्पनेतून आणि अथक प्रयत्नांमुळे हे दालन अल्पावधीत साकार झाले आहे. दिल्लीच्या विशाल बाजारपेठेत स्वयंसहायता गटांच्या उत्पादनांना असलेली मागणी लक्षात घेता, हे दालन सातारा जिल्ह्यातील ग्रामीण उद्योजकांना त्यांची कला, कौशल्य आणि उत्पादने सादर करण्यासाठी कायमस्वरूपी व्यासपीठ प्रदान करेल.

सातारा जिल्ह्यातील स्वयंसहायता गटांनी शेती, अन्नपदार्थ आणि हस्तकला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. इंद्रायणी तांदूळ, सेलम-हळद, सेंद्रिय ज्वारी, बाजरी, स्ट्रॉबेरी, जागरी, शेंगदाणा तेल, घोंगडी, रेशीम वस्त्रे, साबण, मसाले आणि बाजरीचे कुकीज यांसारख्या उत्पादनांनी स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेत विशेष ओळख निर्माण केली आहे. विशेषतः साताऱ्याच्या घोंगडी आणि रेशीम वस्त्रांनी त्यांच्या टिकाऊपणा आणि सांस्कृतिक मूल्यांमुळे दिल्लीच्या ग्राहकांमध्ये लोकप्रियता मिळवली आहे.

उद्घाटन प्रसंगी बोलताना श्रीमती विमला म्हणाल्या, सातारा जिल्ह्यातील लखपती दीदी आणि स्वयंसहायता गटांच्या महिलांनी भेटीदरम्यान दाखवलेल्या उत्साह आणि त्यांच्या उत्पादनांच्या गुणवत्तेमुळे हे दालन साकारण्याची प्रेरणा मिळाली. हे दालन सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण उद्योजकांना त्यांची कला आणि कौशल्य राष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करण्याची संधी देईल. दिल्लीतील मराठी बांधव आणि अन्य ग्राहकांनी या दालनाला भेट देऊन या उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे. त्यांनी पुढे सांगितले की, हे दालन केवळ विक्री केंद्र नसून, सातारा जिल्ह्याच्या सांस्कृतिक आणि आर्थिक वारशाला राष्ट्रीय व्यासपीठावर नेण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

या उपक्रमाला ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे. त्यांनी दिल्ली दौऱ्यादरम्यान दालनासाठी प्रस्तावित जागेची पाहणी करून तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले होते. साताऱा जिल्ह्यातील स्वयंसहायता गटांनी स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. या दालनामुळे त्यांना दिल्लीच्या बाजारपेठेत कायमस्वरूपी स्थान मिळेल, असे गोरे यांनी नमूद केले. सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यशिनी नागराजन यांनीही या उपक्रमाचे स्वागत करत सांगितले की, या दालनामुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळेल आणि त्यांच्या उत्पादनांना योग्य ओळख मिळेल.



दालनात सातारा जिल्ह्याची खास उत्पादने, भौगोलिक मानांकन (ऋख) प्राप्त वस्तू, शेती उत्पादने, हस्तकला आणि गृहउपयोगी वस्तूंचे प्रदर्शन आणि विक्री होणार आहे. भविष्यात फिरते दालन आणि बहुमजली मॉल यांसारख्या सुविधा उपलब्ध करून ग्रामीण उद्योजकता आणि महिला सक्षमीकरणाला आणखी चालना देण्याचे नियोजन आहे. हे दालन महाराष्ट्र सदनाला सातारा जिल्ह्याच्या सांस्कृतिक आणि आर्थिक केंद्राचे स्वरूप देईल, तसेच ग्रामीण उद्योजकांचा आत्मविश्वास वाढवून त्यांच्या आर्थिक प्रगतीला नवी दिशा देईल.